# पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

३ रा मजला, नवीन मध्यवर्ती इमारत, पुणे ४११००१.

पीबीएक्स ०२० –२६१२६७८५/ २६१२६६२८/ फॅक्स ०२० – २६१२७००४/२६१३२४०१.

Email: - dirmktms@gmail.com   Website: www.mahapanan.maharashtra.gov.in


६३३६

जा.क्र.पणन- ५/कृउबास/फळेभाजीपाला नियमन/२०१६./   दिनांक : ८ जुलै, २०१६.

वाचा : महाराष्ट्र शासन राजपत्र, अध्यादेश क्रमांक १५, दिनांक ५ जुलै, २०१६ अन्वये महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे करण्यात आलेल्या सुधारणा.

## : परिपत्रक :

महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ मध्ये (यापुढे कायदा असे संबोधण्यात येईल.) दिनांक ०५/०७/२०१६ रोजीच्या अध्यादेशाद्वारे शासनाने सुधारणा केलेल्या आहेत. सदर अध्यादेशाची प्रत दिनांक ०६/०७/२०१६ रोजी या कार्यालयाने सर्व विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था व बाजार समित्यांना पाठविलेली आहे. सदर अध्यादेशाद्वारे करण्यात आलेल्या सुधारणांच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१. कायदा २ (१) (क) (फ-१ब) अन्वये " **ई- पणन** " **ही नवीन व्याख्या** समाविष्ठ करण्यात आलेली आहे. त्यानुसार शेतमालाचा इलेक्ट्रॉनिक प्रणालीद्वारे शेतमालाच्या खरेदी विक्रीचे व्यवहार करण्याबाबत स्पष्टता आणण्यात आली आहे. " **ई- पणन** " साठी आवश्यक असणाऱ्या सोयीसुविधा सर्व बाजार समित्यांनी आपल्या बाजार आवारात निर्माण करणे आवश्यक आहे.

२. कायदा कलम ६ मध्ये पोट कलम (२-अ) चा नव्याने समावेश करण्यात आलेला असून, त्यानुसार कायदयातील अनुसूचि मध्ये नमूद केलेल्या सर्व फळे व भाजीपाला ( कांदा व बटाटा सह) तसेच आले, लसूण, धणे व मिरची हे मसाल्याचे पदार्थ या शेतमालाच्या बाजार समितीच्या बाजार आवाराबाहेर होणाऱ्या खरेदी विक्रीच्या व्यवहारासाठी कोणत्याही लायसनची अथवा परवानगीची आवश्यकता असणार नाही. मात्र या प्रयोजनासाठी कायदा कलम ५ ड मधील तरतुदीचा अपवाद करण्यात आलेला आहे. ( कायदा कलम ५ ड मधील तरतुदीनुसार थेट पणन, खाजगी बाजार व शेतकरी ग्राहक बाजार या प्रयोजनासाठी लायसन देण्यात येते.)

कायदयातील उपरोक्त बदलानुसार कोणत्याही बाजार समितीस आता फळे, भाजीपाला , आले , लसूण, धणे व मिरची या शेतमालाचे नियमन बाजार समितीच्या बाजार आवाराबाहेर करता येणार नाही याची नोंद घ्यावी.

३. कायदा कलम ३१ (क) (१) मधील तिसऱ्या परंतुका ऐवजी नवीन परंतुका समाविष्ठ करण्यात आलेली आहे. त्यानुसार शेतमालाच्या उत्पादनाच्या प्रथम खरेदी विक्री व्यवहारावर एकदा बाजार फी अदा केली असल्यास त्याच शेतमालाच्या दुसऱ्या बाजार समितीच्या बाजार क्षेत्रामध्ये होणाऱ्या खरेदी विक्रीच्या व्यवहारावर पुन्हा बाजार फी आकारता येणार नाही. सदरची तरतूद ही कायदयातील अनुसूचि मध्ये नमूद केलेल्या सर्व शेतमालासाठी लागू करण्यात आलेली आहे. सदरची तरतूद ही थेट पणन, खाजगी बाजार व शेतकरी ग्राहक बाजाराच्या माध्यमातून होणाऱ्या शेतमालाच्या खरेदी विक्री व्यवहारासाठी सुध्दा लागू आहे याची नोंद घेण्यात यावी व त्याप्रमाणे सर्व संबंधितांनी आवश्यक ती कार्यवाही करावी.

४. कायदा कलम ३१ च्या पोटकलम २ मध्ये करण्यात आलेल्या सुधारणेनुसार आता शेतमालाच्या खरेदी विक्रीच्या व्यवहारावर आकारण्यात येणारी अडत (commission) ही खरेदीदाराकडून घेणेबाबत स्पष्ट तरतूद करण्यात आलेली आहे. त्यामुळे या पुढे कोणत्याही अडत्याला आता नियमनाखालील शेतमालावर शेतकऱ्याकडून अडत वसूल करता येणार नाही.

कायदयातील उपरोक्त सर्व बदलांची योग्य ती दखल सर्व विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था व बाजार समित्यांनी घ्यावी व सदर तरतुदींचे तंतोतंत पालन करण्यात यावे. सदर तरतुदींचे उल्लंघन होत असल्यास महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ व त्याखालील नियम १९६७ मधील तरतुदीनुसार आवश्यक त्या कार्यवाहीस संबंधीत घटक / बाजार समिती पात्र राहतील याची नोंद घेण्यात यावी.

**( डॉ. किशोर तोष्णीवाल )**
**पणन संचालक,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे.**

प्रति,

१. सभापती/सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, (सर्व)
२. खाजगी बाजार (सर्व) / विशिष्ठ वस्तू बाजार (सर्व)
३. थेट पणन परवानाधारक (सर्व)
४. शेतकरी ग्राहक बाजार (सर्व)

प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी रवाना.

१. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)
२. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)